जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2025

तरुण भारत



कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासन कार्यारंभप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. अरविंद जत्ती. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. बसवलिंग पट्टदेवरू, डॉ. तृप्ती करेकट्टी

# शरण साहित्य हा मानवतेचा खजिना

- बेंगळुरुच्या बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांचे गौरवोद्गार

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा बसवेश्वर यांचे विचार आजच्या काळातही प्रेरक असून शरण साहित्य म्हणजे मानवतेचा खजिना आहे. त्यामुळे शरण साहित्य अध्यासनाच्या रुपाने शिवाजी विद्यापीठात शरण इतिहासाचे एक नवे सुवर्णपान लिहीले जात आहे, असे गौरवोद्गार बेंगळुरुच्या बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाचा कार्यारंभ करण्यात आला. या निमित्ताने 'शरण साहित्यः संकल्पना आणि प्रासंगिकता' या विषयावर ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील कार्यक्रमाच्या कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. अरविंद जत्ती म्हणाले, विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव लाभलेले शिवाजी विद्यापीठ आणि विश्वगुरू बसवण्णा यांचे विचार यांचा महासंगम आज करवीरनगरीत होत आहे, अशी भावना आहे. आपले वडील भारताचे माजी उपराष्ट्रपती बी. डी. जत्ती यांचे पदवीचे शिक्षण कोल्हापुरात झाले, अशी आठवणही यावेळी जत्ती यांनी सांगितली.

बसवकल्याण अनुभवमंटपाचे अध्यक्ष डॉ. बसवलिंग पट्टदेवरू म्हणाले, गणितातील तथ्ये ज्याप्रमाणे वैश्विक असतात, त्याचप्रमाणे बसवतत्त्वही वैश्विक आहे. सत्याची ताकद त्यामध्ये आहे. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विज्ञान आणि तत्वज्ञानाचा संगम समजून घेऊन अहंभाव संपविण्यासाठी बसवतत्वांचा अभ्यास आणि आचरण आवश्यक आहे. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी अधिसभेत ठरावाच्या माध्यमातून अध्यासनाचे बीजारोपण केले. त्याला अधिसभेसह व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद या सर्वच अधिकार मंडळांचे समर्थन लाभले. जून २०२५पासून अध्यासनामार्फत महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर दोन क्रेडिटचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होईल. त्याचप्रमाणे कर्नाटकातील विविध विद्यापीठांतील शरण साहित्य अध्यासनांसमवेत सामंजस्य करार करण्यात येतील. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य जी. पी. माळी, डी. यू. पवार, सतीश घाळी, सरलाताई पाटील, डॉ. आप्पासाहेब पुजारी, प्राचार्य टी.एस. पाटील, वसंतराव मुळीक, रावसाहेब पुजारी, यश आंबोळे, डॉ. अनमोल कोठडिया आदी उपस्थित होते.

02 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शरण साहित्य मानवतेचा खजिना

## डॉ. अरविंद जत्ती : विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाचे उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. १ : 'शरण साहित्य अध्यासनाच्या रूपाने शिवाजी विद्यापीठात शरण इतिहासाचे एक नवे सुवर्णपान लिहिले जात आहे,' असे प्रतिपादन बंगळुरूच्या बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांनी आज येथे केले. महात्मा बसवेश्वर यांचे विचार आजच्या काळात प्रेरक असून, शरण साहित्य मानवतेचा खजिना असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी 'शरण साहित्य : संकल्पना आणि प्रासंगिकता' विषयावर मार्गदर्शन केले.

डॉ. जत्ती, बसव कल्याणच्या अनुभव मंटपाचे अध्यक्ष डॉ. बसवलिंग पट्टदेवरू यांच्या हस्ते शरण साहित्याची मराठी, हिंदी, इंग्रजी व कन्नड भाषांतील १५ पुस्तके असलेली टोपली कुलगुरू



कोल्हापूर : शरण साहित्य अध्यासनाच्या उद्‌ घाटनप्रसंगी बोलताना डॉ. अरविंद जत्ती.

डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करून अध्यासनाचे अभिनव पद्धतीने उद्‌घाटन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित, तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला.

### माजी राष्ट्रपती बी. डी. जत्तींच्या आठवणींना उजाळा

■ डॉ. जत्ती यांनी त्यांचे वडील देशाचे माजी राष्ट्रपती बी. डी. जत्ती यांचे पदवीचे शिक्षण कोल्हापुरात झाल्याची आठवण सांगितली. तसेच बसव तत्त्वज्ञानाची वैश्विकता विषद करणारे पॉवर पॉईंट सादरीकरण केले. बसवकल्याण अनुभव मंटपाचे अध्यक्ष डॉ. बसवलिंग पट्टदेवरू यांनीही शिवाजी विद्यापीठातून एम. ए. ची पदवी घेतल्याचे सांगितले.

डॉ. जत्ती म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज व बसवण्णा यांच्या विचारांचा महासंगम करवीरनगरीत होत आहे. बारावे ते एकविसावे शतक व येथून पुढे जगाला दिशा देण्याची क्षमता शरण साहित्यात आहे. या साहित्याला धार्मिक समजणे गैर असून, ते आध्यात्मिक आहे. इतिहास, सार्वजनिक प्रशासन, सामाजिक न्याय ते पर्यावरण असा विविध विषयांचा साहित्यात समावेश आहे. भारतीय संविधानांतील मानवी मूल्ये शरण साहित्यात पाहायला मिळतात. महाराष्ट्र व कर्नाटक यांच्यात राजकीय मतभेद असले, तरी ही दोन राज्ये बसवण्णांच्या आध्यात्मिक साहित्याने जोडली जात आहेत. भविष्यात हे बंध अधिक दृढ होतील.'

डॉ. पट्टदेवरू म्हणाले, 'गणितातील तथ्यांप्रमाणे बसवतत्त्वेही वैश्विक आहे. त्यात सत्याची ताकद आहे. बाराव्या शतकात हजारो शरणांनी प्राणार्पण करून पुरोहितशाही व जातीयवादी प्रवृत्तींपासून या साहित्याचे संरक्षण व जतन केले.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी अधिसभेत ठरावाच्या माध्यमातून अध्यासनाचे बीजारोपण केले. शासन, लोकप्रतिनिधी व दातृत्ववान समाजाच्या पाठबळावर अध्यासन सुरू होत आहे.' दोन जूनपासून बसवण्णांच्या जीवन कार्यावर दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 2 FEB 2025
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधीजींच्या आत्मबलाचा वापर महिलांनी राजकारणात करावा

## किशोर बेडकिहाळ : 'महिलांमधील राजकीय साक्षरता'वर कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १ : 'महात्मा गांधी यांनी शिकविलेल्या आत्मबलाचा वापर महिलांनी राजकारणात करावा', असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'महिलांमधील राजकीय साक्षरता' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. स्वयंसिद्धाच्या अध्यक्ष कांचन परुळेकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार अध्यक्षस्थानी होते. बेडकिहाळ म्हणाले, 'स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींनी अहिंसेचा मार्ग अवलंबताना महिलांमधील आत्मबल जागृत केले.



कोल्हापूर : 'महिलांमधील राजकीय साक्षरता' विषयावरील कार्यशाळेत बोलताना किशोर बेडकिहाळ. यावेळी उपस्थित विक्रम जरग, डॉ. आर. जी. पवार, कांचन परुळेकर, प्रा. यशोधन बोकील, डॉ. प्रकाश पवार.

त्यांना राष्ट्रीय चळवळीत आणले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्याचा लढा व्यापक झाला. आजच्या राजकारणात महिलांना प्रतिनिधित्व मिळाले असून, त्यांनी आत्मबलाचा वापर समाजहिताकरिता करावा.'

परुळेकर यांनी आजच्या महिला अबला नसून सबला असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. नेहा वाडेकर, डॉ. सचिन भोसले, डॉ. नितीन रणदिवे, डॉ. उर्मिला दशवंत यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. प्रकाश पवार प्रमुख उपस्थित होते. प्रा. यशोधन बोकील यांनी प्रास्ताविक केले. विक्रम जरग यांनी आभार मानले.

02 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक समस्या निवारणासाठी एकजूट आवश्यक

## कुलगुरू : 'जागतिकीकरण समकालीन समस्या आणि आव्हान' या विषयावर राष्ट्रीय परिषद संपन्न

**कागल : प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर असणाऱ्या समस्या आणि त्या निवारणासाठी वेगवेगळ्या स्तरांवर विविध प्रकारचे उपक्रम सुरू आहेत. जागतिक समस्या निवारण्यासाठी एकजुटीने लढणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

येथील डी. आर. माने महाविद्यालयामध्ये भूगोल विभागाच्या वतीने 'जागतिकीकरण समकालीन समस्या आणि आव्हाने' या विषयावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, डी. आर. माने महाविद्यालयाने या ज्वलंत विषयावर उचललेले पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. आपल्या दैनंदिन जीवन व्यवहारातील प्लास्टिक वजा केले, तर प्लास्टिक समस्येपासून आपण निश्चितच सुटका मिळवू शकतो. जागतिकीकरणाचा जसा निसर्गावर प्रभाव पडलेला आहे, तसा प्रभाव सर्व क्षेत्रांवर पडलेला जाणवतो.

संस्थेचे संचालक बिपिन माने यांनी या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून निश्चितच एक आशावादी चित्र निर्माण होईल, असे मत व्यक्त केले.

परिषदेसाठी एकूण २९० प्राध्यापक संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. १५५ सहभागी संशोधकांनी पेपर वाचन केले. परिषदेसाठी कर्नाटक, उत्तर प्रदेश, गोवा या राज्यांतील अनेक प्रसिद्ध विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापकांनी पेपर वाचन केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रवीण चौगले यांनी केले. त्यांनी संस्थेचा मागोवा घेतला, तसेच परिषद आयोजनामागील भूमिका सांगितली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सुनील माने, प्रा. डॉ. आदिनाथ गाडे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम हे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2025
पुण्यनगरी

# भाषेची सातत्याने चिकित्सा आवश्यक

## शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात सूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित मराठी भाषाविषयक परिसंवादात बीजमांडणी करताना रवींद्र इंगळे-चावरेकर.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भाषेला सौष्ठव व श्रेष्ठत्व प्राप्त होण्यासाठी हजारो वर्षे जावी लागतात. त्यासाठी सातत्याने तिची मीमांसा, चिकित्सा केली पाहिजे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात उमटला. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते.

मराठी अधिविभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत 'मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक सिद्धांतांची पुनर्मीमांसा' या विषयावर एकदिवसीय परिसंवाद आयोजित केला होता. परिसंवादात रवींद्र इंगळे-चावरेकर (बुलढाणा), डॉ. दिलीप चव्हाण (नांदेड), डॉ. गोमटेश्वर पाटील (कोल्हापूर) यांनी मार्गदर्शन केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य जी. पी. माळी, डॉ. अनिल गवळी, डॉ. मेघा पानसरे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. अरुण शिंदे आदी उपस्थित होते.

02 FEB 2025
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुंतवणुकीला चालना देणारा अर्थसंकल्प : प्रा. ककडे

## चेंबर ऑफ कॉमर्स आणि प्रेस क्लबच्या वतीने अर्थसंकल्पावर चर्चासत्र

**कोल्हापूर :** यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये १२ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करण्यात आल्याने हा निर्णय सर्वसामान्यांना मोठा दिलासा देणारा ठरणार आहे. तसेच बाजारात पैसा येऊन मंदी कमी होण्यास मदत होईल. गुंतवणुकीला चालना देणारा अर्थसंकल्प असल्याचे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. विजय ककडे यांनी व्यक्त केले. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज व कोल्हापूर प्रेस क्लबच्या वतीने आयोजित अर्थसंकल्पावरील चर्चासत्रात ते बोलत होते.

प्रा. ककडे म्हणाले, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थमंत्री म्हणून आठवा अर्थसंकल्प मांडला असून, हे एक रेकॉर्ड झाले आहे. त्यांनी सर्वसामान्यांना डोळ्यासमोर ठेवूनच अर्थसंकल्पाची मांडणी केली आहे. लघू, तसेच मध्यम उद्योगाला चालना देण्यासाठी अनेक योजना या अर्थसंकल्पात आहेत. तसेच बेरोजगारीवर मात करण्यासाठी आवश्यक रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनाही यामध्ये करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे एकूणच हा अर्थसंकल्प वेगळी दिशा देणारा ठरेल, अशी अपेक्षा आहे.

तस्लिमअरिफ मुल्लाणी म्हणाले, या अर्थसंकल्पामध्ये काही चांगल्या गोष्टी दिलेल्या आहेत. तसेच बारा लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केल्याने वार्षिक एक लाख रुपयांचा फायदा होणार आहे. परिणामी, हेच पैसे मोठ्या प्रमाणात बाजारात येतील आणि त्याचा परिणाम मंदी कमी होण्यावर होईल, अशी अपेक्षा आहे.

स्वागत कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे यांनी, तर प्रास्ताविक कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2025

पुण्यनगरी



केंद्रीय अंदाजपत्रक विकसित भारताचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने पोषक आहे. हे अंदाजपत्रक प्रामुख्याने शेती आणि उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून आर्थिक विकासाची प्रगती, गती आणि व्याप्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करते; मात्र सामाजिक विकासाकडे अपेक्षित लक्ष या अंदाजपत्रकाने दिलेले नाही. शिक्षण, आरोग्य, रोजगार, गरिबी, विषमता यांच्याकडे अक्षम्य असे दुर्लक्ष झालेले आहे. तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्याक यांना विकास प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्यात हे अंदाजपत्रक अयशस्वी ठरले आहे. उत्पन्न करात सवलत देऊन मध्यमवर्गीयांवरील कराचा बोजा कमी करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकातून करण्यात आलेला आहे.

– डॉ. पी. एस. कांबळे, वरिष्ठ प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ, अर्थशास्त्र विभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2025

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात मंगळवारी सबज्युनिअर अ‍ॅथलेटिक्स स्पर्धा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनच्यावतीने शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर मंगळवारी (ता. ४) कोल्हापूर जिल्हा सबज्युनिअर अ‍ॅथलेटिक्स स्पर्धा आयोजित केली आहे.

स्पर्धा ८, १०, १२, १४ वर्षांखालील मुले, मुली या गटात घेतल्या जातील. विजेत्या स्पर्धकांना पदक व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. आठ वर्षांखालील गटात सहभागी होणाऱ्या खेळाडूंची जन्मतारीख १ फेब्रुवारी २०१७ ते २८ फेब्रुवारी २०१९ या दरम्यान असावी. दहा वर्षांखालील गटात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडूचा जन्म १ मार्च ते २०१३ ते २८ फेब्रुवारी २०१७ असावा. बारा वर्षांखालील गटासाठी १ मार्च २०१३ ते २८ फेब्रुवारी २०१५ असावी. चौदा वर्षांखालील खेळाडूंचा जन्म १ मार्च २०११ ते २८ फेब्रुवारी २०१३ अशी असावी. स्पर्धेतून पंढरपूर (जि. सोलापूर) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संघ निवडला जाईल. अधिक माहितीसाठी जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनचे सचिव प्रा. प्रकुल पाटील मांगोरे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन असोसिएशनमार्फत केले आहे.

02 FEB 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अन्वेशन संशोधन स्पर्धेत विद्यापीठाला तीन पारितोषिके

## कृषी रोबोट, धरण आपत्ती सूचना प्रणाली प्रथम तर वनस्पतींपासून औषध निर्मितीला तृतीय क्रमांक

### ■ आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेसाठी निवड



कोल्हापूर : पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत सहभागी शिवाजी विद्यापीठाच्या संघासोबत डॉ. मानसिंगराज निंबाळकर आणि डॉ. नेहा जोशी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवी मुंबई येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठात झालेल्या पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी तीन पारितोषिके प्राप्त केली. कृषी रोबोट, धरण आपत्ती सुचना प्रणालीला प्रथम तर दुर्मिळ वनस्पती घटकांपासून औषध निर्मितीच्या प्रकल्पाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मार्चमध्ये अंबाला येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेसाठी विजेत्या संशोधकांच्या प्रकल्पांची निवड झाली आहे.

कृषी व संलग्न क्षेत्रे या गटात विघ्नेश उत्तम पाटील, ताहीर निसार मुल्ला आणि दीक्षा निवास घोसरवाडे यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांनी शेती व्यवस्थापनासह जनावरांची देखभाल करणारा 'कृषी रोबोट' सादर केला. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान गटात शुभम गिरीगोसावी, बालाजी प्रकाश पाटील आणि रोहित गणपती गवळी यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. धरणाच्या भिंतीला धोका झाल्यास संभाव्य जीव व वित्तहानी टाळण्यासाठी आपत्तीची पूर्वसूचना देणाऱ्या प्रणालीचे सादरीकरण केले.

मूलभूत विज्ञान गटात सुषमा राजीव देशमुख व अनुष्का रॉय यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यांनी दुर्मिळ वनस्पती घटकांपासून औषध निर्मितीचा प्रकल्प सादर केला. विजेत्यांना भारतीय विद्यापीठ महासंघाच्या (ए.आय.यू.) संशोधन विभागाचे संचालक डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या हस्ते आणि रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. एम.डी. पाटील यांच्या उपस्थितीत पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विजेत्या संशोधकांना त्यांचे प्रकल्प आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेत सादर करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

स्पर्धेच्या सामाजिक विज्ञान व मानव्यशास्त्रे, आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे, मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषी व संलग्न क्षेत्रे आणि आंतरविद्याशाखीय संशोधन या सहा संशोधन गटांमध्ये विद्यापीठाचा १४ जणांचा संघ सहभागी झाला होता. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील डॉ. मानसिंगराज निंबाळकर व सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयाच्या डॉ. नेहा जोशी यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.

स्पर्धेतील विजेत्यांसह सहभागी संशोधक विद्यार्थ्यांचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले यांच्यासह आविष्कार समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, जीवरसायनशास्त्र अधिविभागाचे डॉ. पी. के. पवार आणि विलिंग्डन महाविद्यालयाचे डॉ. एस. डी. जाधव यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2025

पुण्यनगरी

# स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यात महिलांची भूमिका महत्त्वाची

## डॉ. विलास शिंदे : बेटी बचाओ अभियानांतर्गत कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यामध्ये महिलांची फार महत्त्वाची भूमिका आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले. विद्यापीठाचे 'बेटी बचाओ अभियान' आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बेटी बचाओ अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या कार्यशाळेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी वैद्यकीय गर्भपात कायदा आणि पोक्सो कायदा या अनुषंगाने जागृती करण्यात आली.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थी-विद्यार्थिनींना या कायद्यांची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक संतुलनासाठी स्त्री-पुरुष गुणोत्तर जपणे आणि कोणत्याही मुलीची गर्भातच हत्या न होऊ देणे, यासाठी प्रत्येक नागरिकाने आपापल्या स्तरावर दक्षता घेतली पाहिजे. समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार म्हणाल्या, कौटुंबिक स्तरावर मुलांचे संगोपन करताना मुलगा-मुलगी असा कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला स्थान देता कामा नये.

विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगले, ॲड. गौरी पाटील, समाजसेविका गौरी हसूरकर यांनी मार्गदर्शन केले. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुप्रिया वडर आणि योगेश कर्चे यांनी सूत्रसंचालन केले. आकाश ब्राह्मणे आणि डॉ. योजना पाटील यांनी आभार मानले.

02 FEB 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिशादर्शक अर्थसंकल्प



विश्लेषण
प्रा. डॉ. विजय ककडे

विकसित भारत हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने २०२५-२६ चा अर्थसंकल्प महत्त्वाचा ठरतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपत्ती व संपन्नतेची देवी लक्ष्मी गरीब व मध्यमवर्गावर 'कृपावर्षाव' करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्या अपेक्षांची कितपत पूर्ती झाली, हे पाहिले की, अर्थसंकल्पाची दिशा स्पष्ट होते.

**नव्या हरित क्रांतीकडे :** अन्नदाता शेतकरी केवळ धान्य पिकविणारा न राहता त्याच्याकडे धन आले पाहिजे, या भूमिकेतून पंतप्रधान धनधान्य योजना ही अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य ठरते. शेतीची कमी उत्पादकता हा कळीचा प्रश्न असून कमी उत्पादकता असणाऱ्या १०० जिल्ह्यांत उत्पादकता वाढीची योजना राबविली जाणार आहे. यामध्ये पिकांच्या एकसूत्रिपणाऐवजी विविधता आणणे, हंगामानंतर साठवण व्यवस्था उत्तम ठेवणे, उत्पादनास आवश्यक जलसिंचन सुविधा देणे, पतपुरवठा देणे अशी एकत्रित पॅकेज सुविधा दिली जाणार आहे. शेती क्षेत्रात वाढत्या उत्पादनातून व समृद्धीतून शेतीतून किंवा ग्रामीण भागातून नाईलाजाने किंवा जगण्यासाठी होणारे स्थलांतर थांबेल व चांगली संधी असेल, तरच ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर होईल असा विश्वास देण्याचा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला आहे. भारतीय कृषी व्यवस्थेची मर्यादा ही तेलबिया उत्पादनात असून या क्षेत्रात आत्मनिर्भरता किंवा स्वयंपूर्णता साध्य करण्यास प्राधान्य दिले आहे. कडधान्य ही उत्पादनाच्या दृष्टीने अद्याप मागणीच्या तुलनेत कमी असल्याने त्यासाठी सहा वर्षांचे तूर, उडीद व मसूर यांचे राष्ट्रीय अभियान हाती घेण्यात आले आहे. शेतीव्यवस्था अधिक व्यापारी तत्त्वावर चालणारी होण्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था (FPO) आणि सहकारी संस्था यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. यासाठी उच्च-पैदास प्रकार बियाणाची उपलब्धता वाढविणे, फळे, भाजीपाला या उपयुक्तदायी उत्पादन रचनेकडे नेण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात झालेला दिसतो. शेतकऱ्यांना अपुऱ्या कर्जपुरवठ्याची समस्या मोठ्या प्रमाणात असल्याने त्यातून आत्महत्या वाढतात. हे दुष्टचक्र थांबवण्याचा भाग म्हणून शेतकऱ्यास सवलतीच्या दराने पुरेसा कर्जपुरवठा व्हावा, यासाठी किसान क्रेडिट कार्ड योजना असून त्याचा लाभ ७.५ कोटी शेतकऱ्यांना होत आहे. याची कर्ज मर्यादा ३ लाखांवरून ५ लाख करण्यात आली आहे. परिणामी, सवलतीचे म्हणजे ४ टक्के दराचे कर्ज आता ५ लाखांपर्यंत उपलब्ध होईल. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादकतावाढीचे आव्हान मोठे असून त्याकरिता कापूस उत्पादकता वाढ अभियान सुरू करण्यात येणार आहे. ग्रामीण भागाची संपर्क यंत्रणा, वित्त सोयी या सर्व बाजूने पोस्ट ऑफिस महत्त्वाचे असून त्याचा वापर पायाभूत सुविधा म्हणून करण्याचा निर्णय या अर्थसंकल्पाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

**लघू व मध्यम उद्योगांवर भर :** शेती या प्राथमिक घटकानंतर दुसरा महत्त्वाचा रोजगारवृद्धीस पूरक ठरणारा घटक हा छोट्या व मध्यम उद्योगांचा असतो. या उद्योगासाठी अर्थसंकल्पात प्रेरक व पोषक तरतुदी केल्या असून त्याकरिता गुंतवणूक मर्यादा ५ कोटींवरून १० कोटी, तर स्टार्टअपकरिता १० कोटींवरून २० कोटी मर्यादा वाढविली आहे. त्यांना १० लाख कर्ज तत्काळ मंजुरीचे दिले जाणार असून फंड ऑफ फंड यातून १०,००० कोटींचा निधी दिला जाणार आहे. स्टँडअप इंडियाअंतर्गत महिला उद्योजकांना प्रोत्साहित करताना २ कोटींचे दीर्घ मुदत कर्ज दिले जाणार आहे. यामध्ये पादत्राणे, चामड्याच्या वस्तू व खेळणी उद्योग केंद्रस्थानी असून भारताला खेळणी उत्पादनात जागतिक केंद्र बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

**गुंतवणूक चालना :** अर्थसंकल्पाची तिसरी परिवर्तन शक्ती गुंतवणुकीबाबत असून येथे मानवी भांडवलनिर्मितीस प्राधान्य दिले आहे. सक्षम अंगणवाडी व पोषण कार्यक्रम याचा आधार आहे. ग्रामीण शिक्षण अद्ययावत होण्यास सर्व शाळांना ब्रॉड बँड उपलब्धता, संशोधनवृत्तीस चालना देणारे अटल टिंकरिंग लॅब हे उपक्रम महत्त्वाचे आहेत. स्थानिक भाषेत पुस्तक उपलब्धता ही लक्षणीय योजना ठरते. उच्च शिक्षणात वाढीव जागा, जनभागिदारीतून पेयजल उपलब्धता या सुविधा विकास प्रक्रिया समावेशक बनवतात. पर्यटन व्यवसाय रोजगारनिर्मितीत महत्त्वाचा असून विमान प्रवासात उडान योजना सर्व छोट्या शहरांना जोडत आहे. वीज उत्पादनात अणुउर्जा, स्वच्छ ऊर्जा प्राधान्य उद्योग विकासाला आवश्यक वीज देऊ शकतात. गृहबांधणी क्षेत्रास १५ हजार कोटींची तरतूद रोजगार वाढीसही महत्त्वाची ठरते.

**रोजगारवाढीवर भर :** वाढत्या श्रमशक्तीला कौशल्याची जोड दिल्याने दारिद्र्य घटणार आहे. शून्य दारिद्र्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्व स्तरावर रोजगारवाढ महत्त्वाची ठरते. असंघटित क्षेत्रात तात्पुरते काम करणारे गिग वर्कर यांची नोंदणी व त्यांची सुरक्षा १ कोटी अशा कामगारांना महत्त्वाची ठरते. वाढत्या पर्यटन उद्योगात मेडिकल टुरिझम वाढत असून 'भारतात या आणि बरे व्हा' हा कार्यक्रम रोजगारवाढ करणारा ठरतो. देवदर्शन सहल हाही पर्यटनाचा विस्तारणारा घटक स्थानिक रोजगार वाढविणारा आहे.

**मध्यमवर्गाची दिवाळी :** अर्थसंकल्पबाबत नेहमी आयकर हा अत्यंत संवेदनशील घटक असतो. या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीय करदात्यांना लॉटरी लागली असेच म्हणावे लागेल. शून्य कर उत्पन्न मर्यादा २०१४ मध्ये २.५ लाख होती ती आता १२ लाख अशी वाढली असून त्यामुळे १२ लाख उत्पन्न असणाऱ्यांना ८० हजार, १८ लाख उत्पन्न असणाऱ्यास ७० हजार, तर २५ लाख उत्पन्नधारकास १.१० लाख फायदा होणार आहे. हे सर्व नव्या कररचनेत आहे, हे मात्र लक्षात हवे.

**विकासप्रेरक अर्थसंकल्प :** एकुणात २०२५-२६ चा अर्थसंकल्प रोजगारावर भर देणारा, गुंतवणुकीस चालना देणारा व मध्यमवर्गीयांच्या खिशात पैसे वाढवणारा आहे. कर सवलतीतून बाजारातील मंदी कमी होऊन उत्पादनवाढ, गुंतवणूकवाढ होईल, असे सकारात्मक बदल घडतील, यासाठी शेती, लघुउद्योग, गुंतवणूक व निर्यात याला चालना देणारा हा अर्थसंकल्प सकारात्मक दिशा देणारा ठरतो.

02 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामान्यांसाठी दिवाळी असणारा अर्थसंकल्प

## प्रा. विजय ककडे : चेंबर ऑफ कॉमर्स व प्रेस क्लबतर्फे चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १ : 'केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये १२ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करण्याच्या घेतलेल्या निर्णयाने सर्वसामान्यांची दिवाळी झाली आहे. करसवलतीमुळे बाजारात पैसा येऊन मंदी कमी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर गरजूंसाठी स्वस्त घरे, युवकांसाठी रोजगार संधी मिळणार आहे. एकंदरीत गुंतवणुकीला चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे', असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. विजय ककडे यांनी आज येथे व्यक्त केले.




कोल्हापूर : कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व कोल्हापूर प्रेस क्लबतर्फे शनिवारी अर्थसंकल्पावर आयोजित चर्चासत्रात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. विजय ककडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी तस्लिमअरिफ मुल्लाणी, राजू पाटील, संजय शेटे, शीतल धनवडे, प्रशांत शिंदे आदी उपस्थित होते.

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीजच्या कार्यालयात चेंबर ऑफ कॉमर्स व कोल्हापूर प्रेस क्लबतर्फे आयोजित अर्थसंकल्पावरील चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडिया-कोल्हापूर चॅप्टरचे अध्यक्ष तस्लिमअरिफ मुल्लाणी, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे, उपाध्यक्ष धनंजय दुग्गे, मानद सचिव प्रशांत शिंदे, अजित कोठारी, ग्राहक पंचायतचे कमलाकर बुरांडे, प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे, चार्टर्ड अकौंटंट सुनील नागावकर, दीपक गुंदेशा, चेतन ओसवाल प्रमुख उपस्थित होते. प्रा. ककडे म्हणाले, 'या अर्थसंकल्पाची मांडणी सर्वसामान्यांना डोळ्यासमोर ठेवून केली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनिश्चितता, अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांचे धोरण, भारतातील मंदी व बेरोजगारी या प्रमुख चार बाबींवर अर्थसंकल्पाची मांडणी झाली आहे.'

तस्लिमअरिफ मुल्लाणी म्हणाले, '१२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केल्याने वार्षिक एक लाख रुपयांचा फायदा होणार आहे. हेच पैसे मोठ्या प्रमाणात बाजारात येतील आणि त्याचा परिणाम मंदी कमी होण्यावर होईल.' संजय शेटे म्हणाले, 'हा अर्थसंकल्प व्यापार व उद्योगासाठी पोषक आहे. तसेच १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केल्याची घोषणा प्रत्यक्षात आणावी.' सुनील नागावकर म्हणाले, 'बाजारात पैसा येणे गरजेचे आहे. यासाठी अर्थसंकल्पातून एकप्रकारे तरतूदच करण्यात आली आहे.' शीतल धनवडे यांनी स्वागत केले. प्रशांत शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. धनंजय दुग्गे यांनी आभार मानले.